सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महायुती अभेद्य, अफवांवर विश्वास ठेवू नका

## महायुतीचे अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या –रावसाहेब दानवे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

जालना भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाई युती अभेद्य असून महायुतीचे सरकार येण्यासाठी एक एक आमदार महत्त्वाचा आहे. त्यामुळे कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले. जालना येथील हॉटेल गॅलेक्सी मध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने एक कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिव–सेनेचे नेते माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, उपाध्यक्ष भास्करराव दानवे, राजेश राऊत, सिद्धिविनायक



मुळे, रामेश्वर भांदर्गे, सतीश जाधव ,कपील दहेकर ज्ञानेश्वर ढोबळे , सुहास मुंडे,शिकांत घुगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, अनिरुद्ध खोतकर, मेघराज चौधरी, विष्णू पाचफुले यांच्यासह भाजप शिवसेना राष्ट्रवादी त्रिपाई युतीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ भाजप नेते रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, राज्यात भाजप शिवसेना राष्ट्रवादी रिपाई युतीची महायुती आहे. महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार आणायचे आहे. त्यासाठी महायुतीला एक एक आमदारही अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे महायुतीचे सर्व पदाधिकारी नेते एक दिलाने प्रचारात सक्रिय सहभागी झालेले आहेत. भोकरदन विधानसभा मतदारसंघात नुकताच शिवसेनेचा मेळावा पार पडला. या मेळाव्यास शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच बदनापूर येथे भाजपचे उमेदवार नारायण कुचे यांच्या प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी शिव–सेनेचे नेते माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर हे स्वतः उपस्थित होते. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातही महायुती अभेद्य आहे. निवडणुकीच्या दरम्यान विरोधक वेगवेगळ्या अफवा पसरवतील. त्यामुळे विरोधकावर विश्वास न ठेवता महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या. अर्जुनराव खोतकर यांना सर्व समाजघटकातून मिळत असलेला पाठिंबा आणि समर्थन पाहता त्यांचा विजय निश्चितपणे होणार आहे. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी कोणत्याही अफवेला बळी न पडता अर्जुनराव खोतकर यांनाच निवडून द्यावे. कोणी खोटा प्रचार करीत असेल तर त्यास जाब विचारावा व पक्ष नेत्यांच्या लक्षात आणून द्यावे असे आवाहनही माजी केंद्रीय मंत्री श्री. दानवे यांनी केले.

### “ झाले गेले गंगेला मिळाले – अर्जुन खोतकर

यावेळी बोलताना उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर म्हणाले की, मागे जे झाले ते गंगेला मिळाले. आमच्या दोघांच्याही चुका होत्या आणि दोघांनाही जखमा झाल्या होत्या. यापुढे आम्ही कधीच अशा चुका होऊ देणार नाही. आगामी निवडणुका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजे कार्यकर्त्यांच्या असणार आहे. त्यामुळे आम्ही एक दिलाने प्रयत्न करणार आहोत. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकदिलाने जिल्ह्यातील सर्व जागा निवडून आणाव्यात असे आवाहन श्री खोतकर यांनी केले.

# भोकरदन शहरात दारूबंदी अधिकारी सोनवणे याची मस्ती

## पत्रकार शेन खातात का? अर्वाश्च भाषेत केली शिविगाळ

भोकरदन : गेल्या पंधरवाडा भरा–पासून भोकरदन शहर आणि तालुक्यातील विविध भागांमध्ये आचार संहीता काळात अचानक रस्त्या रस्त्यांवर अवैध देशी विदेशी दारूची विक्री होत असतांनाचे वृत पत्रकार नामदे यांनी प्रकाशित केल्यानंतर याचा बदला म्हणून हाच सोनवणे पत्रकार नामदे यास तु मला बघीतलेस का? तुझी औकात काय आहे तुम्ही पत्रकार शेन खातात का? अशि अर्वाश्च भाषा वापरून शिविगाळ केल्याचा प्रकार समोर आला आहे.

भोकरदन शहरासह तालुक्यातील अनेक दुकानातुन मोटार सायकल वरून दिवसा ढवळ्या दारूची वाहतूक करून गाव खेड्यात अनाधीकृत पणे पोचवली जाते त्याचबरोबर भोकरदन शहरातील गल्लोगल्ली आणि भर रस्त्यावरील दारूचे अड्ड्यांवर पोचवली जात असून याबाबत पत्रकार नामदे यांनी वृत्त प्रकाशित केले असतांना दारूबंदी अधिकारी ज्ञानेश्वर सोनवणे याने चक्क पत्रकारांला तुम्ही बातमी छापतांना शेन खाता का असे म्हणून अपमानास्पद फोनवर भाषा वापरली आहेत.भोकरदन मतदारसंघाची निवडणूक देखील सुरू असल्याने दारूच्या दुकानावरून बॉक्सचे बॉक्स मोटारसायकल वरून जात असल्याचे चित्र दिसत असल्याने नवल वाटत आहे. खरे तर सन २०२१ पासुन राज्य शासनाने अठरा वर्षांखालील मुलांना विद्यार्थ्यांना बिअर बारमध्ये प्रवेश नसल्याचा जिआर असतांनी हेच अधिकारी मात्र बारवाले आणि ढाब्या वाल्यांकडून वसुली करून मोकळे होतात हे मात्र तेवढेच खरे.

# महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर सोयाबीनला ७ हजार रूपये भाव देणार–राजाभाऊ देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/ प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक २०२४ रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली असून महाराष्ट्रातील जनतेने महाराष्ट्रात महाविकास आघाडीचेच सरकार येणार असल्याचे अनेक मतदान सर्वेक्षण कंपन्यांकडून दिसुन येत असून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सोयाबीनला ७ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव देणार असे कॉंग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

आपल्या प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे,प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी नुकत्याच एका जाहीर सभेत घोषणा केली की महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यास सोयाबीनला प्रतिक्विंटल ७००० हजार रुपये भावासह १) महालक्ष्मी योजनेंतर्गत प्रत्येक महिलांच्या खात्यात दरमहा ३००० हजार रुपये जमा करणार व महिला व मुली यांना मोफत बस प्रवास करणार. २) कुटुंब रक्षण योजनेंतर्गत २५ लाखांपर्यंत आरोग्य विमा देणार व मोफत औषधोपचार करणार, ३) समानतेची हमी योजनेंतर्गत जातीनिहाय जनगणना करणार व ५०% आरक्षण मर्यादा




हटविण्यासाठी प्रयत्न करणार, ४) कृषी समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज माफी करणार व नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी ५०००० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन देणार, ५) युवकांसाठीच्या योजनेंतर्गत प्रत्येक बेरोजगार तरुणांना दर महिन्याला ४००० हजार रूपये बेरोजगारी भत्ता देण्यात येणार या पंचसुत्री योजनेची घोषणा करण्यात आली आहे. जालना जिल्हातील पाच ही विधानसभेतील महाविकास आघाडीच्या उमेदवारास येत्या २० नोव्हेंबर २०२४ गुरुव–ाररोजी भरघोस मतदान करून विजयी करण्याचे आवाहन राजाभाऊ देशमुख यांनी केले आहे.

## सोयाबीनला हमीभाव ४ हजार ८९२ तर खरेदी ४२०० रुपयाने!

# भोकरदन बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्याची लूट!

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदनच्या बाजार समितीच्या आवारात मोठ्या प्रमाणात सोयाबीनची शनिवार रोजी आठवडी बाजार असल्याने मोठ्या प्रमाणावर आवक होती, एकीकडे हमीभाव जाहीर झालेले असले तरी प्रत्यक्षात व्यापारी मात्र सोयाबीनचा दर्जा ओलावा पाहुनच खरेदी करीत आहेत. डागी आणि ओल्या सोयाबीनचे भाव २२०० पासून पुढे होते तर चांगल्या सोयाबीनला ४२०० वर देण्यात आला निवडणुकीत सोयाबीनचा मुद्दाही गाजत आहे. विरोधक शेतमालाच्या हमीभावावरून सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीकास्त्र सोडीत आहेत. याप्रकरणी भोकरदन कृषी उत्पन्न बाजार समिती व प्रशासना च दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे यामुळे हा सर्व प्रकार घडत असल्याचे बोलल्या जात आहे तसेच यामुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. खरीप हंगाम संपून रब्बीचा हंगाम सुरू झालेला आहे. प्रत्येक शेतकऱ्याला यावर्षी पाणी उपलब्ध झाल्याने रब्बीची पेरणी करायची आहे. त्यासाठी हमीभावापेक्षा कमी



भाव जरी मिळत असला तरी सुद्धा हातात असलेला शेतमाल थोड्याफार प्रमाणात विक्री करावा लागत आहे. हमीभाव केंद्रापर्यंत सोयाबीन नेणे प्रत्येकाला परवडत नाही. हमीभाव केंद्राची संख्या वाढवावी अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे. भोकरदन तालुक्यात भोकरदन व राजुर फक्त दोन ठिकाणी हमीभाव खरेदी केंद्र सुरू झाले असून तिथे ४८९२ रुपये किंटल दराने सोयाबीनची खरेदी केली, जात आहे, खरेदीस मर्यादा असून हेक्टरी १३ क्विंटल पर्यंतच नोंदगी केलेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी केली जाते. प्रत्येक शेतकऱ्याला हमीभाव केंद्रावर सोयाबीन नेता येत नाही. त्यामुळे नईलाजाने त्यांना व्यापाऱ्याकडे सोयाबीन विकावी लागत आहे. शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम सुरू झाला असून रब्बीच्या पेरण्या सुरू झालेल्या आहेत.

भोकरदन येथील शनिवार आठवडी बाजारात बाजार समितीच्या आवारात विविध व्यापाऱ्यांकडे ४०० ते ७०० क्विंटल पेक्षा जास्त सोयाबीनची आवक असल्याची समजते. व्यापारी मात्र सोयाबीनचा ओलावा मालाचा दर्जा पाहूनच शेतमालाला भाब देतात ओलावा असलेल्या सोयाबीनला ३५०० पासून भाव देण्यात येतो तर सुकलेला चांगला वाढलेला दर्जेदार सोयाबीनला सुद्धा व्यापाऱ्यांनी फक्त ४२०० चा भाव दिलेला आहे. कारण जागतिक मंदी सोयाबीनच्या रोजच्या भावात होणारी चढ–उतार शासनाची धोरणे आदीमुळे सध्या सोयाबीनचे भाव खुल्या बाजारामध्ये कमी झालेले आहेत. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. एकीकडे हमीभाव केंद्र प्रमाणे देण्यात यावे असे धोरण शासनाचे आहे.

# संक्षिप्त

## आचारसंहिता व खर्च तक्रारीसाठी सी–व्हिजील प, टोल फ्री क्रमांक १९५० जारी


**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील नागरिकांनी आदर्श आचारसंहिता व खर्चाच्या संबधित तक्रारीसाठी सीव्हिजील प तसेच नागरिकांना निवडणूक विषयक काही शंका असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

सीव्हीजील प आदर्श आचारसंहिता व खर्चाच्या संबधित तक्रारीसाठी सीव्हीजील प हे नागरिकांसाठी आदर्श आचारसंहिता आणि निवडणुकीदरम्यान होणा–या खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी एक अभिनव मोबाईल ॲप्लिकेशन आहे. त्यामुळे सदरील पवर विधानसभा परिक्षेत्रातील नागरिकांनी आदर्श आचारसंहिता आणि निवडणुकी दरम्यान होणाऱ्या खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी याचा वापर करावा. या ॲपवर नोंदविलेल्या तक्रारीचे निराकरण १०० मिनिटात करण्यात येईल. यावर नागरिक लाऊडस्पीकरच्या आवाजाचे उल्लंघन झाल्यास, अवैध मद्य वाटप व वाहतूक, परवानगी शिवाय बॅनर व पोस्टर लावल्यास, पेड न्युज, फेक न्युज आढळुन आल्यास, प्रलोभन दाखविल्याची तक्रार असल्यास अशा घटनांविरोधात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी या ॲपचा वापर करणे अपेक्षीत आहे. अगदी एका मिनिटांत आपणाला निवडणूक काळात सुरु असलेल्या गैरप्रकाराबददल तक्रार नोंदवता येईल. गैर प्रकाराबाबत फोटो, व्हिडीओ (२ मिनिटांचा) यावर अपलोड करता येईल. तुम्ही पाठविलेल्या माहितीवरुन तक्रारी बाबतचा ठाव ठिकाणा शोधला जाईल. तक्रार केल्यानंतर १०० मिनिटांत निवडणुक आयोगाचे भरारी पथक घटनास्थळी पोहचून तक्रारीचे निवारण करील. विशेष म्हणजे आपण दिलेली माहिती व आपले नाव गोपनीय ठेवले जाईल. नागरिक निनावी तक्रार देखील या ॲपवर नोंदवू शकतात.

निवडणूक प्रक्रियेत सुसूत्रता आणि अधिकाधिक मतदारांच्या उपयुक्ततेसाठी भारतीय निवडणूक आयोगाने १९५० ही हेल्पलाईन कार्यान्वित केली आहे. ही हेल्पलाईन २४ तास सुरु असून याद्वारे मतदारांच्या विविध तक्रारींचे निवारण केले जाते. नागरिकांना निवडणुक आणि मतदानासंबंधीची माहिती वेळोवेळी देणे, नवीन मतदार नोंदणी सोबतच मतदारांच्या विविध शंकाबाबत मार्गदर्शन, मतदान ओळखपत्रात बदल किंवा स्थलातंर झाले असल्यास, मतदान यादीत नाव नोंदवायचे असल्यास काय करावे याबाबत मार्गदर्शन, मतदान ओळखपत्र व मतदान अर्ज निगडीत सर्व माहिती, या हेल्पलाईनच्या सहाय्याने मतदार नोंदणीसाठी संबधितांना अधिकृत माहिती मिळविणे सोपे झाले आहे. मतदार यादीतील त्यांच्या वैयक्तिक माहितीचे तपशील, मतदान केंद्र बुथ लेव्हल अधिकारी यांचे संपर्क क्रमांक या विषयीची माहिती १९५० या हेल्पलाईनवर फोन करुन मिळविता येईल. तसेच या क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या निवडणुक विषयक तक्रारीची दखल देखील घेण्यात येत आहे. असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी (खर्च), जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# धार्मिक कार्यक्रमातुन दिला मतदान जनजागृतीचा संदेश



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतुर येथील निवडणूक विभागाच्या वतीने मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले यातच उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी श्रीमती सरिता गुंजकर यांनी चक्क तुलसी विवाह या धार्मिक विधीतून मतदारांना जनजागृती करण्यासाठी रांगोळीतील संदेशाने जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे याबाबत अधिक माहिती अशी की,

९९– परतुर विधानसभा मतदार संघांतर्गत मा. निवडणुक निर्णय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृतीचे कामकाज प्रभावीपणे सुरु आहे. तसेच प्रत्येक सजान नागरिकाला भारतीय संविधानाने मतदान करण्याचा समान हक्क प्रदान केलेला आहे व मतदान है कार्यरत लोकशाहीचे एक महत्व–पुर्ण पैलु आहे आणि सर्व मतदारांनी ९९– परतुर विधानसभा मतदार संघातंर्गत सर्व मतदाराने येत्या २० नोव्हेंबरला मतदानाचा हक्क बजवावा याकरिता तुलसी विवाह या धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने रांगोळी काढुन मतदान जनजागृतीबाबत संदेश देण्याचा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे.

# लोणीकरांवर जनतेचा वाढता विश्वास; अनेकांचा भाजपात प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

सातोना बुद्रुक येथील असंख्य युवकांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर साहेब व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या विकास कामावरती विश्वास ठेवून व नारायणराव बिडवे गोपाळराव बिडवे सरपंच निवृत्ती बिडवे सर यांच्या पुढाकाराने अनेक युवकांनी भाजपामध्ये प्रवेश केला प्रवेशामध्ये उ.बा.ठा. गटाचे सातोना सर्कल प्रमुख बाळाभाऊ बिडवे मुंजा बिडवे नामदेव बिडवे नारायण बिडवे शंकर बिडवे भरत बिडवे केशव बिडवे विजय बिडवे सदाशिव बिडवे बळीराम तायडे पंढरी बिडवे अनिल बिडवे दिगंबर बिडवे कुलदीप बिडवे हनुमान बिडवे बाळाभाऊ बिडवे जगदीश बिडवे अंगद घेंबड गणेश बिडवे भगवान आव्हाड राजाभाऊ निर्वळ अक्षय बिडवे गजानन बिडवे लक्ष्मण सोळंके लखन बिडवे गोविंद बिडवे अशा असंख्य युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला

(वृत्तपत्र, टीव्हीवर प्रकाशित करण्यासाठी उमेदवारासाठी
गुन्हेगारी प्रकरणांबद्दल घोषणा

(२०११ च्या....(सिव्हील) क्रमांक २३६ मधील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ च्या निकाल–ानुसार (पब्लिक इंटरनेट फौंडेशन आणि .... वि युनियन ऑफ इंडिया आणि.....)

उमेदवाराचे नाव आणि पत्ता : बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर)
राजकीय पक्षाने नाव : भारतीय जनता पार्टी
निवडणुकीचे नाव : विधानसभा
मतदारसंघाचे नाव : विधानसभा परतूर–९९

मी बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (उमेदवाराचे नाव), वर नमूद केलेल्या निवडणुकीसाठी उमेदवार माझ्या गुन्हेगारी पुर्ववृत्तांबद्दल खालील तपशील सार्वजनिक माहितीसाठी घोषित करतो :

| अ.क्र. | प्रलंबित फौजदारी खटले | | | गुन्हांसाठी दोषी ठरलेल्या प्रकरणांबद्दल तपशील | |
|---|---|---|---|---|---|
| | कोर्टाचे नाव | प्रकरण क्रमांक आणि प्रकरणाची स्थिती | संबधित कायद्याची कलमे आणि गुन्ह्याचे संक्षिप्त वर्णन | कोर्टाचे नाव तारिख ऑर्डर | वर्णन आणि गुन्ह्याचे आणि शिक्षा |
| १) | १) निरंक<br>२) तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परभणी<br>३) निरंक<br>४) निरंक<br>५) खंडपीठ औरंगाबाद<br>६) निरंक<br>७) निरंक<br>८) निरंक<br>९) निरंक | १) पो.ठा.परतूर जि.जालना (एन सी क्र.०६७/२०२४<br>२) पो.ठा.नवा मोंढा परभणी जि.परभणी (२४४, १०७/२०२०) ३) पो.ठा.नवा मोंढा परभणी जि.परभणी (३०५/२०२०)<br>४) पो.ठा.आष्टी ता.परतूर जि.जालना (३०२१/२०१४)<br>५) रिट याचिका क्रं.१७२६/२०१८<br>६) पो.ठा.सेवली ता.जि.जालना (२४९/१९९९)<br>७) पो.ठा.आष्टी ता.परतुर जि.जालना (३२७/१९९२)<br>८) पो.ठा.आष्टी ता.परतुर जि.जालना (२५/१९८६)<br>९) पो.ठा.आष्टी ता.परतुर जि.जालना (१०९/१९८५) | १) भादवी १७१ (ड) निवडणुकीत व्यक्तीमत्व संबंधी<br>२) भादवी १८८, म.पो.अ.१३५, अ.प.दा.व्यवस्थापन कायदा ५१ (ब) निवडणुकीत प्रभाव, निर्देशाचे उल्लंघन, आप्पती व्यवस्थापन कायदा कसूर<br>३) म.पो.का.१३५, भादवी १८८, २६९ सह ५१ (ब), कोविड क्रं.११, क, ३ सा.रो. आप्पती व्यवस्थापन कायदा भंग<br>४) १७१, (११) १८८ भादवी निवडणूक विषयक<br>५) निरंक<br>निरंक<br>६) भादवी १७१ (ई) आर्थिक बाबी बाबत आरोप<br>७) भादवी ३२३, ५०४ साधी दुखापत<br>८) निरंक<br>निरंक<br>९) निरंक<br>निरंक | १) निरंक<br>२) निरंक<br>३) निरंक<br>४) निरंक<br>५) निरंक<br>६) निरंक<br>७) निरंक<br>८) निरंक<br>९) निरंक | १) निरंक<br>२) निरंक<br>३) निरंक<br>४) निरंक<br>५) निरंक<br>६) निरंक<br>७) निरंक<br>८) निरंक<br>९) निरंक |

✻ राज्यपरिषदेची निवडणूक किंवा आमदारांना विधान परिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत, मतदारसंघाच्या नावाऐवजी संबंधित निवडणुीकाचा उल्लेख करा

टीप : (१) प्रत्येक केससाठी स्वतंत्र पत्तींमध्ये तपशील स्वतंत्रपणे द्यावा.
(२) वर्तमानपत्रातील बाबी कमीत कमी १२ च्या फॉन्ट आकारात असावी

१) ०४/११/२०२४
२) ०९/११/२०२४
३) १७/११/२०२४

**स्वाक्षरीत**
**उमेदवाराचे निवडणुक प्रतिनिधी**
**सुनिल दत्तात्रय शिवनगिरीकर**